सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## कृषि विभाग
## नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प

३० अ/ब-अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड , मुंबई ४०० ००५

दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल:mahapocra@gmail.com

**पत्र क्र.नादेकृसंप्र-०६२४/प्र.क्र.६९/प्रशा / ६३७** **दिनांक: ०८ .०७.२०२४**

**प्रती,**

**विषय:- Tea Coffee Vending Machine तसेच Tea & Coffee Powder चा पुरवठा करण्यानुषंगाने दर पत्रक सादर करणेबाबत.**

**संदर्भ :- मा. प्रकल्प संचालक यांची मंजुर टिप्पणी दिनांक २०.०६.२०२४**

१. आपणास खालील मालाचा /साहित्याचा पुरवठा करणेसाठी स्पर्धात्मक दर सादर करणे बाबत विनंती करण्यात येत आहे.

| मालाचे / साहित्याचे वर्णन | तांत्रिक निकष | संख्या | पुरवठा करण्यासाठीचा कालावधी | पुरवठा करावयाचे ठिकाण | स्थापनेसाठी आवश्यकता (Installation Requirement) |
|---|---|---|---|---|---|
| Tea & Coffee Vending machine | ४ option, विनाभाडे आणि देखभाली सहित | १ | १ वर्ष | नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प ३० अ/ब अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड , मुंबई ४०० ००५. | होय |
| Tea & Coffee Powder | तपशील सोबत जोडला आहे. | एकूण २० KGS (प्रति माह) | मागणी केल्यावर ७ दिवसांच्या आत. | नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प ३० अ/ब अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड , मुंबई ४०० ००५. | नाही |

२. शासनास जागतिक बँकेकडून नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पासाठी निधी मंजूर झालेला आहे .सदर निधी मधील काही रक्कम या दरपत्रकाअन्वये करण्यात येणाऱ्या करारनाम्यानुसार करावयाच्या पात्र प्रदानासाठी वापरण्यात येणार आहे .

३. निविदा किंमत

अ. करार हा वरील नमूद केलेल्या एकूण संख्येसाठी असेल. त्यात काही बदल असु शकेल.

ब . वस्तूच्या एकूण किंमतीमध्ये सर्व कर व उपकर यांचा समावेश असेल.

क. वस्तू व सेवाकर वेगळा दाखविण्यात यावा.

ड. निविदाकाराने सादर केलेले दर हे करारानाम्यातील कालावधीसाठी स्थिर असतील व त्यात कोणत्याही कारणामुळे बदल होणार नाही.

इ. दरपत्रकातील दर हे भारतीय रुपयात सादर करावेत.

४ .प्रत्येक निविदाकार एकच दरपत्रक सादर करेल. या दरपत्रकाबाबत निविदाकार इतर निविदाकारांशी संपर्क करणार नाही .

**५ .दरपत्रकाची वैधता**

दरपत्रक सादर करावयाच्या अंतिम तारखेपासून ६० दिवसापर्यंत दरपत्रक वैध राहील .

**६.दरपत्रकांचे मुल्यमापन**

खरेदीदार खालील बाबींबाबत निविदाकरांनी दिलेल्या प्रतिसादाशी दरपत्रकांची तुलना व मुल्यमापन करेल.

अ. दरपत्रके योग्य प्रकारे स्वाक्षरी केलेले आहेत.

ब. दरपत्रकातील अटी, शर्ती व निकषांची पूर्तता करतात.

क.ज्या वस्तूंचे दर सादर करण्यास सांगितले आहेत त्याच वस्तूंचे दर सादर करण्यात यावेत.

ड .सोबत दिलेल्या दरपत्रक सादर करावयाच्या नमुन्यातच दरपत्रक सादर करणे बंधनकारक आहे.

दरपत्रकातील सर्व वस्तुंची तुलना व मुल्यमापन एकत्रित करण्यात येईल / सर्व वस्तुंची तुलना व मुल्यमापन वेगवेगळे करण्यात येईल.

वस्तु व सेवाकर दरपत्रकांचे मुल्यमापन करण्यासाठी ग्राहय धरण्यात येणार नाही.

**७. पुरवठा आदेश**

ज्या निविदाकाराचे दरपत्रक सर्वात जास्त प्रतिसादात्मक असून त्याचे दर हे सर्वात कमी आहेत त्या निविदाकाराला पुरवठा आदेश देण्यात येईल.

७.१ खरेदीदारास कोणतेही दरपत्रक मान्य करण्याचा वा अमान्य करण्याचा अधिकार व दरपत्रकांची प्रक्रिया रद्द करुन सर्व दरपत्रके रद्द करण्याचा अधिकार पुरवठा आदेश देण्याअगोदर राहील.

७.२ ज्या निविदाकाराचे दर मान्य करण्यात आलेले आहेत त्यांना दरपत्रकाची वैधता संपण्याच्या अगोदर कळविण्यात येईल. मान्य केलेल्या दराबाबतच्या अटी पूरवठा आदेशामध्ये समाविष्ट करण्यात येतील.

८. मालाचा पुरवठा केल्यानंतर देयकाची अदायगी करण्यात येईल.

९. पुरवठा केलेल्या मालासाठी सामान्य व्यावसायिक हमी (Warranty/ Guaranty) लागू राहील.

१०. आपणांस विनंती करण्यात येते की, सोबत जोडलेल्या नमून्याप्रमाणे आपले सीलबंद दरपत्रक दि.२५ .०७.२०२४ पर्यंत दुपारी ३.३० वाजेपर्यंत सादर करावे. यावर "Tea Coffee Vending Machine, Tea Coffee Powder करीता दरपत्रक" असे नमुद करावे. प्राप्त दरपत्रके त्याच दिवशी दुपारी ४.०० वाजता उघडण्यात येतील.

११. सदर दरकराराचा कालावधी १ वर्षाचा राहील. समाधानकारक सेवा असल्यास करारास ६ महिन्यांसाठी मुदतवाढ देण्यात येईल.

१२. आम्हाला आशा आहे की, आपण आपले दरपत्रक सादर कराल तसेच, आपण या प्रकल्पात इच्छा दाखविल्याबाबत धन्यवाद.

दिनांक : ०८/०७/२०२४

ठिकाण : मुंबई

नावः डॉ. मेघना केळकर

हुद्दाः कृषि व्यवसाय विशेषज्ञ

तथा प्रकल्प उपसंचालक

पत्ता : ३०/अ-ब अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर,

कफ परेड , मुंबई-०५.

दुरध्वनी क्र : ०२२-२२१६३३५१/५२

# दरपत्रक सादर करावयाचा नमूना

दिनांक:

प्रती,

मा. प्रकल्प संचालक

विषय:- Tea Coffee Vending Machine तसेच Tea & Coffee Powder चा दर पत्रक सादर करणेबाबत.

| अ.क्र | वस्तुचे /मालाची वर्णन | निकष | एकक (युनिट) | प्रति युनिट सादर केलेले दर (रुपये) | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | Tea Coffee Vending Machine | | १ | -- | -- |
| २ | Tea Elaichi | | १ किलो | | |
| ३ | Tea Masala | | १ किलो | | |
| ४ | Coffee | | १ किलो | | |
| ५ | Tea Sugarless | | १ किलो | | |
| ६ | Coffee Sugarless | | १ किलो | | |
| ७ | Green Tea | | १ पॅकेट | | |
| ८ | Lemon Tea | | १ पॅकेट | | |
| ९ | Desi kawa | | १ पॅकेट | | |
| | **एकूण** | | | | |
| | **वस्तु व सेवाकर** | | | | |
| | **एकूण किंमत** | | | | |
| **(अक्षरी : रुपये ..............................................................)** | | | | | |

- वरील तांत्रिक निकषाप्रमाणे मालाचा पुरवठा एकूण किंमत रुपये ............ (अक्षरी रुपये ............................) व दरपत्रकात नमूद कालावधीमध्ये करण्यास आम्ही तयार आहोत.
- तसेच पुरवठा केलेल्या मालासाठी सामान्य व्यावसायिक हमी (Warranty/ Guaranty) लागू राहील याची आम्ही खात्री देतो.
- तसेच आम्ही प्रमाणित करतो की, आमच्यासाठी किंवा आमच्या वतीने काम करणारी कोणतीही व्यक्ती ही भ्रष्ट मार्ग अवलंबणे, फसवेगिरी करणे, संगनमत करणे, दडपशाही करणे, अडथळा आणणे इ. बाबींचा अवलंब हे दर पत्रक सादर करतांना व करारनाम्याची पूर्तता करतांना करणार नाहीत, याबाबत आम्ही योग्य त्या उपाययोजना केलेल्या आहेत.

(पुरवठादाराची स्वाक्षरी)

**दिनांक :**
**ठिकाण :**

नाव:
हुद्दा:
पत्ता :
दुरध्वनी क्र: